जा.क्र./ 06 /२०२४
जिल्हा न्यायालय, अमरावती
दिनांक :- 02/०१/२०२४.

प्रति,

नोटीस बोर्ड
जिल्हा न्यायालय,
अमरावती.

**विषय** :- लेझर प्रिंटरचा वार्षिक देखभाल कराराकरीता बंद निविदा मागविणेबाबत........

**संदर्भ** :- वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचा दिनांकः२७/१२/२०२३ च्या टिप्पणीवरील आदेशानुसार.

महोदय,

वरील संदर्भांकित टिपणीस अनुसरून वि. वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, अमरावती व अचलपुर येथे सन २०१६ मध्ये वि.उच्च न्यायालय, मुंबई यांचे मार्फत पुरविण्यात आलेले लेझर प्रिंटरची मुळ किंमत रूपये ३२८४७२.०० किंमत आहे. त्यामुळे लेझर प्रिंटरचा देखभाल करार करणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने सदरहु लेझर प्रिंटरचा वार्षिक देखभाल करार दिनांक ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ पर्यत दयायचा आहे. करीता, वार्षिक देखभाल करारावाबत निविदा बंद पाकीटात दिनांक १२/०१/२०२४ पुर्वी सायंकाळी पाच वाजेपर्यंत जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे पाठवावी.

आदेशानुसार

(ए.एस.काझी)
जिल्हा प्रकल्प समन्वयक
तथा जिल्हा न्यायाधीश-२
अमरावती

**सोबत** :- लेझर प्रिंटरची माहिती व शर्ती अटीसह..

**District & Sessions Court, Amravati.**

LIST OF PRINTERS WITH PRICE

Year- 2016

UNDER E-COURT PROJECT

(Amravati and Achalpur)

| S.N. | NAME OF THE PRINTER | QUANTITY | PRICE PER UNIT | TOTAL |
|---|---|---|---|---|
| 1 | HP LaserJet Pro M202 dw | 38 | 8644.00 | 3,28,472.00 |
| | | | **TOTAL...** | **3,28,472.00** |

# संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल/दुरूस्तीबाबतच्या शर्ती व अटी

| | |
|---|---|
| १ | मोहोरबंद निविदा हया प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे नावाने जिल्हा न्यायालय, कॅम्प, अमरावती—४४४६०२ या पत्त्यावर दिनांक १२/०१/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. सायंकाळी ५.०० वाजता नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही. |
| २ | सदर्हु निविदा सुचनेत नमुद लेझर प्रिंटरचा कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपुर्णत: वगळण्याचे अधिकार हे मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांनी राखुन ठेवले आहे. |
| ३ | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहे. |
| ४ | लेझर प्रिंटरचा वार्षिक देखभाल/दुरूस्ती करार अमरावती आणि अचलपुर येथील न्यायालय व कार्यालयात प्रतिष्ठापित केलेल्या लेझर प्रिंटर करीता राहील |
| ५ | करार झाल्यावर आपल्या कंपनीचा एक अभियंता अमरावती येथे हजर असणे जरुरीचे आहे. कंपनी/अभियंत्याकडे यंत्रसामग्री दुरुस्ती बाबत तक्रार दिली असता त्यांना सदरहु तक्रार २४ तासाचे आत हजर राहुन दुरुस्ती करुन दयावी लागेल. |
| ६ | मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दुरध्वनीव्दारे लेझर प्रिंटरची दुरुस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. |
| ७ | लेझर प्रिंटर दुरुस्ती मध्ये सुटे भाग दुरुस्ती करीता नेल्यास दोन दिवसाचे आंत सदरहु सुटे भाग दुरुस्त करुन जोडणी करुन दयावी लागेल. दुरुस्तीला विलंब लागत असल्यास त्या ठिकाणी पर्यायी लेझर प्रिंटर उपलब्ध करुन दयावे लागेल. |
| ८ | वरील नमुद न्यायालयातील संगणक यंत्रसामुग्री मध्ये Linux/Windows/Ubuntu Operating System व Case information System वापरण्यात येते याची नोंद घ्यावी. |
| ९ | निविदा मंजुर झालेल्या कंपनीला १००/— रुपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करुन दयावा लागेल व सदरहु १००/— रुपयाचा बॉन्डपेपरचा खर्च कंपनीला सोसावा लागेल. |
| १० | वार्षिक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर निविदा मंजुर झालेल्या कंपनीला सोसावे लागेल. |
| ११ | लेझर प्रिंटरची व्यापक (Comprehensive) देखभाल / दुरुस्ती राहील. |
| १२ | Laser Printers Fuser Asembly दुरुस्ती अथवा बदलुन देणे करारामध्ये राहील. |
| १३ | देयक हे त्रैमासीक पध्दतीने त्रैमासीक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यांत येईल. |
| १४ | देयक हे द्विप्रतीत संपुर्ण तपशीलासह या कार्यालयात सादर करावे लागेल. |
| १५ | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळुन देयक अदा करण्यांत येईल |
| १६ | करारानुसार व अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार संपुर्णत: रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांना राहील. |

(ए.एस.काझी)
जिल्हा प्रकल्प समन्वयक
तथा जिल्हा न्यायाधीश-२
अमरावती